**संपादकीय......**

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, कार्यस्वरूप आणि वास्तव' या विषयावरील एक दिवसीय आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय चर्चासत्रामधील शोध निबंधाचे 'नवज्योत' जर्नलमध्ये प्रकाशन होत आहे. ही बाब अत्यंत आनंदाची आहे.

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा मूलमंत्र देऊन भारतातील वंचित समाजाला आत्मसन्मान देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने विश्वरत्न होते. त्यांनी आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, कृषी, जलसिंचन इत्यादी अनेक समाज विकासात्मक मांडलेले विचार भारतालाच नव्हे तर संपूर्ण विश्वाला मार्गदर्शन असे ठरलेले आहेत. आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही हे विचार मार्गदर्शन ठरतात. म्हणूनच पुन्हा एकदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे मंथन होणे ही काळाची गरज आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रत्येक भारतीयांसाठी एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना आपण माणसाला माणूसपणा मिळवून देणारे एक अलौकिक व्यक्तिमत्व म्हणून ओळखतो.

महाड सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, मनुस्मृती दहन, हिंदू कोड बिल अशी इतर अनेक सामाजिक कार्ये त्यांनी केली. स्त्री वर्ग, शेतकरी, मजूर, पददलित समाजाला त्यांनी समतेची वाट दाखवून दिली.

भारतीय संविधानाचे शिल्पकार असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचेच नाही तर विश्वाचे महामानव आहेत. ते समस्त भारतीयांचे प्रेरणास्थान आहेत.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, कार्यस्वरूप आणि वास्तव' प्रस्तुत मुख्य विषयाला मध्यवर्ती ठेऊन एकूण ५० उपविषयांवर आधारित आर्ट्स, कॉमर्स, सायन्स, विधी, सामाजिक शास्त्रे इत्यादी विभागातील प्राध्यापक वर्गांनी, संशोधक विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत आपले शोधनिबंध पाठवून दिले आहेत. या शोधनिबंधाचा विचार केला तर ज्या उद्देशाने आम्ही प्रस्तुत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, कार्यस्वरूप आणि वास्तव' हा विषय प्राध्यापक व संशोधक विद्यार्थीसमोर चिंतन, मनन व लेखनासाठी ठेवला होता तो सफल झाला असे वाटते.

**प्रा. डॉ. सुजय पाटील**
कमला कॉलेज, कोल्हापूर